# भारतीय भ्रष्टाचार निवारण संस्था

# ANTI CORRUPTION INTELLIGENCE COMMITTEE

*प्लॉट नंबर ७, रहेजा गार्डन समोर, टिप टॉप प्लाझाच्या पाठिमागे,*

*एल.बी.एस. मार्ग, त्रिमुर्ती लेन, उधवाणी आणि कंपनी*

*कंपाऊड, तीन हात नाका, ठाणे (प.) ४००६०४. मो.क्र. ०८८९८०४१९९९*

## भ्रष्टाचार म्हणजे काय ?

भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट असा आचार, माणसाचे अशुध्द, अपवित्र, नीतीनियमांना सोडून केलेले बेकायदा वर्तन म्हणजे 'भ्रष्टाचार ' होय. येथे एक गोष्ट नक्षात घेतली पाहिजे की, पैशाची अफरातफर वा लाचलुचपत यांचा संबंध तरच तो भ्रष्टाचार असे नव्हे आपल्या आर्थिक वा अन्य लालसा अनैतिक, बेकायदेशीर, अपवित्र पध्दतीने तृप्त करण्याचा प्रयत्न करणे सुध्दा भ्रष्टाचारच होय.

सरकारी मालकीच्या सार्वजनिक उदयोगांविरुध्द तक्रार करता येते. रेल्वे, दुरसंचार, बँका, कंपन्या, वीजमंडळ वगैरे अनेक आस्थापनांविरुध्द स्वतः ग्राहक किंवा ग्राहाकांच्यावतीने ग्राहक संघटना तक्रार करु शकतो. आतापर्यंत शेकडो ग्राहकांना त्यांच्यावरील अन्यायविरुध्द दिलासादायक निर्णय मिळाले.

### (अ) भ्रष्टाचारमुक्त व्यवस्थेसाठी आवश्यकबाबी :-

१) **सुप्रशासन** :- लोकांची कामे वेळेवर होण्यासाठी शासकीय कारभाराची सूत्रबद्ध व प्रामाणिक – पध्दत म्हणजे 'सुप्रशासन' होय.

२) **पारदर्शकता** :- कामकाजाची पध्दत इतकी, काटेकोर, सुस्पष्ट हवी की कोणतयाही प्रकारच्या शंकेला जरासुध्दा वाव राहणार नाही. यालाच कामकाजातील 'पारदर्शकता' म्हणतात.

३) **उत्तरदायियत्व** :- आपण करत असलेल्या कामाबद्दल कोणाला तरी जाब द्यावा लागणे म्हणजे ' उत्तरदायित्व' होय.

४) **विश्वसार्हता** :- प्रशासनातील सर्व स्तरावरील कर्मचारी आणि अधिकारी हे नैतिकदृष्ट्या शुध्द आचरण आहेत व कामकाजाची पध्दत अचूक, अंत्यत निर्दोष व काटेकोर आहे. असा विश्वास नागरिकांत असणे म्हणजे ' विश्वसार्हता' होय.

५) **जबाबदारी** :- कोणत्याही घटकांचा नियमबाह्य वापर न करता, आपल्या पदाचा व अधिकारांचा गैरवापर न करता कर्तव्याचे पालन करणे ही प्रत्येक कर्मचा-यांना व अधिका-यांची जबाबदारी होय.

### (ब)भ्रष्टाचारांमुळे संपूर्ण देशाचे नुकसान होते.

भ्रष्टाचारामुळे संबंधित व्यक्तीचेच नुकसान होते. असे सर्वजण समजतात. पण ही समजूत चुकीची आहे. कच-यांमध्ये नागरिकांची कामे करताना पैसे घेतले जातात. एकदा पैसे घ्यायची चअक लागली की, मग पैसे देणा-याचे कामे होऊ लागतात. पैसे देऊ न शकणा-या लाखों लोकांची कामे होत नाही. केंद्र शासनाने ' ग्राहक संरक्षण कायदा १९८६' कार्यान्वित केला आहे.

### भ्रष्टाचाराचे प्रकार

१) **आर्थिक भ्रष्टाचार** :- श्रम न करता किंवा कमी श्रमात झटपअ श्रीमंत होण्याच्या लालसेने माणसे भ्रष्टाचार करायला प्रवृत्त होतात. शेअर घोटाळा असे कितीतरी घोटाळे ही आर्थिक घोट्याळ्यांची मोठी उदाहरणे होत. आपले आसन देशाची स्थिती सुधारण्यासाठी अब्जावधी रुपायांची विविध कामे करत असते. परंतु अधिकारपदावरील काही मुठभर भ्रष्टाचारी व्यक्ती कंत्राटदाराशी संगनमत करुन त्यच्याकडून वारेमाप पैसे घेतात आणि कंत्राटदार थातुरमातुर कामे करुन पैसे घेतात आणि कंत्राअदार थातुरमातूर कामे करुन पैसे आपल्या देशात राजकारणी व नोकरशहा यांच्या अक्षरशः टौळ्याच्या बनल्या आहेत. या टोळ्या देशाला लुभाडतात.

२) **सामाजिक भ्रष्टाचार** :- जातीयता, धर्मांधता, अंधश्रध्दा यांमुळेही भ्रष्टाचाराला खतपाणी मिळते. बालविवाह, हुंडापध्दत, लग्नासंमारंभातील संपत्तीची उधळपट्टी, चो-या, दरोडे, दंगली या गोष्टी भ्रष्टाचाराला अधिकाधिक वाव देतात. दलितांना समान वागणूक देणे, त्याच्यावर बहिष्कार टाकणे या गोष्टीही सामाजिक भ्रष्टाचारात मोडतात. जे सामाजिक व्यवहार माणसाला अनीतीने व सामाजिक न्यायाचा विरुध्द चालण्यास प्रवृत्त करतात. वैयक्तिक स्वार्थाची लालसा भडकतात. ते सामाजिक व्यवहार म्हणजे 'सामाजिक भ्रष्टाचार' होय.

३) **प्रशासकीय भ्रष्टाचार** :- शासकीय धोरणाच्या अमंलबजावणी वेळी अनेक कर्मचारी – अधिकारी मध्यल्यामध्ये गैरव्यवहार करतात. उदा. : १) भुकंपग्रस्तांनी जाहिर झालेली मदत वाटप काहीजणांनी हडप केली. नागरिकांच्या सोयीसाठी अनेक प्रकल्प देशभर सतत चालू असतात. या प्रकल्पांना अमंलबजावणी वेळी अनेक कर्मचारी आणि अधिकारी लाच घेतात. त्यामुळे प्रकल्प नीट, काटेकोरपणे पूर्ण होत नाहीत. यात देशाचे म्हणजेच जनतेचे अतोनात नुकसान होते. हे सर्व प्रशासकीय भ्रष्टाचाराचे नमुने आहेत.

४) **राजकीय भ्रष्टाचार** : आपल्या देशात म्हणजेच लोकशाही आहे. लोक आपले प्रतिनिधी निवडून येण्यासाठी राजकारणी गैरमार्गाने उपयोग करतात. हजारो कोटी रुपये या काळात उधळले जातात. निवडून आल्यावर लोकप्रतिनिधी खर्च झालेला पैसा गैरमार्गाने पुन्हा मिळवतात. हे चक्र सतत चालू राहते. हे लोक सदोदित देशाला लुटत असतात. आमदार- खासदारांचे पक्षांतर घडवून आणणे, कोणाचे तरी सरकार पाडणे, एखाद्याला मंत्रिपद देणे, विविध मंडळावर स्वतःच्या लहानसहान कामांसाठीही त्याचे तासन्तास वाया जातात. त्या वेळेतून कसलेही उत्पादन घडत नाही. देशाच्या विकासात भर पडत नाही.

भ्रष्टाचाराचा आणखी एक दुष्परिणाम होतो. गरिबांकडून पैसे मिळत नाहीत. म्हणून या गरिबांची स्थिती सुधारण्यासाठी आखलेल्या अनेक योजना नीट पार पडत नाहीत. परिणामी त्यांची हातात कमी पैसा येतो. अशा गरिबांची संख्या प्रचंड आहे. साहजिकच त्याच्याकडून बाजारात कोणत्याही वस्तुला मागणी निर्माण होऊ शकत नाही. मागणी नाही म्हणून उत्पादनाला चालना मिळत नाही. रोजगार निर्माण होत नाही. उद्योजकांना नफा मिळे शकत नाही. म्हणजेच देशाची अर्थव्यवस्था प्रगती करु शकत नाही. देशाची भराभराट होत नाही. परिणामतः लोकांना अनेक सोयीसुविधा मिळू शकत नाहीत.

भ्रष्टाचारामुळे कामे वेळेवर होत नाहीत. कालांतराने त्याच कामांचा खर्च वाढतो. या वाढीव खर्चाचे ओझे समाजावरच येऊन पडते. कामाचा दजर्झाही राखला जात नाही. त्यामुळे साधनसंपत्ती नुकसान होतेच. शिवाय नागरिकांना चांगल्या सुविधा मिळत नाहीत.

एकदंरीत, भ्रष्टाचारामुळे देशाच्या प्रगतीला खीळ बसते.

५) **सांस्कृतिक भ्रष्टाचार** :- भ्रष्टाचाराने आता सांस्कृतिक क्षेत्रही व्यापले आहे. पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव, वाढता चंगळवाद, फोफावलेली स्वार्थी वृत्ती यांमुळे आपल्या सांस्कृतिक व्यवहारांनी अंत्यत ओंगळ, हिडीस रुप आले आहे. आपल्याकडील काही सांस्कृतिक कार्यक्रमांकडे नजर टाकली. तर हे प्रकर्षाने लक्षात येईल. दमदाटी करून वर्गण्या गोळा करणे, त्या पैशाचा अपहार करणे, त्याच पैशात राजरोस मदयपान करुन हिडीस नाचगाणी करणे हे दृश्य आता नित्याचे झाले आहे. थोर पुरुषांच्या जयंत्या- पुण्यतिथ्यासुध्दा याला अपवाद राहीलेल्या नाहीत. आपल्या चित्रपटामध्ये संपत्तीचे भपकेबाज प्रदर्शन, बीभत्स देहप्रदर्शन , लैगिकता, हिंसा, गुन्हेगारी याच गोष्टी ठळकपणे आढळतात. हा सर्व भ्रष्टाचारच होय. याला ‘ सांस्कृतिक भ्रष्टाचार’ म्हणतात.

६) **शैक्षणिक भ्रष्टाचार** :- काहीजण परिक्षेत कॉपी करतात. गैरमार्गाने परिक्षा देण्याचा प्रयत्न होतो. पैसे देऊन गुण मिळवले जातात. परिक्षा घेण्याचा प्रक्रियेतील काहीजण पावित्र्य दूर ठेवून पैसे मिळवण्यासाठी परिक्षा यंत्रणेचा दुरुपयोग करतात. सध्या शेकड्यांनी शाळा- महाविद्यालये निर्माण होत आहेत. यातील बरीचशी राजकारणी लोक व व्यापारी लोक यांनी निर्माण केली आहेत. त्यांचा या संध्या उभारण्यातील उद्देशच मुळात पैसा कमावण्याचे एक नवीन दुकान सुरु करणे हा असतो. घरजू पालकांची पिळवणूक करुन हे लाखों रुपये मिळवतात. शिक्षणाचा प्रसार करणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे इत्यादींचा विचार अल्पप्रमाणातही त्याच्या मनात नसतो. म्हणजे विदयार्थी, शिक्षक, संस्थाचालक इत्यादी सर्वच भ्रष्टाचारात सामील झालेले आहेत. हा शैक्षणिक भ्रष्टाचाराचा प्रकार होय.

आपण अगदी बारकाईने निरीक्षण केले, तर जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचार फोफावत चालला आहे, असे दिसून येते.

### ★ भ्रष्टाचाराची कारणे ★

भ्रष्टाचार आता जगभर पसरत चालला आहे. सर्व जगातील समाजधुरीण वाढत्या भ्रष्टाचारामुळे चिंताग्रस्त झाले आहेत. भ्रष्टाचार ही आता सगळया जगापुढील समस्या बनली आहे. आपल्याला भ्रष्टाचार नष्ट करायचा असेल तर भ्रष्टाचाराचे मूह शोधावे लागेल. तेव्हा आपण या प्रकरणात भ्रष्टाचारामागील कारणे पाहू.

१) **संपत्तीविषयीचा दृष्टीकोन** :- माती व सोने यांना सारखेच मानणा-या संताची भूमी म्हणजे आपला देश. येथे संपत्तीला पूर्वी किंमत नव्हती असे नाही, परंतु संपत्ती म्हणजेच जीवनाचे सार्थक असे मानले जात नव्हते. स्वार्थापेक्षा त्यागाला येथे महत्त्व होते. त्यामुळे सर्व समाजाचे जीवन, उदात, पवित्र, अशा तत्त्वांनी चालवण्याचा प्रयत्न होत होता.

आता मात्र हा दृष्टीकोन पूर्णतः बदलला आहे. संपत्तीला महत्त्व आले आहे. धनवानांना समाजात प्रतिष्ठा आली आहे. पैसेवाला मित्र चांगला, जास्त महागडी वस्तू भेट म्हणून दिली, तर जास्त प्रेम व्यक्त होते. असा दृष्टीकोन निर्माण झाला आहे. त्यामुळे आता फक्त पैसा मिळवणे हेच सर्वांचे ध्येय बनले आहे. जास्त पैसा असेल, तर आपण जास्त सन्मानित होऊ असे वाटू लागले आहे. पैसा कसा मिळाला यापेक्षा किती मिळाला याला महत्त्व आले आहे. साहजिकच साधनशुचिता पाळली जात नाही. वाम मार्गांनी पैसे मिळवणे चुकीचे वाटत नाही. यामुळे भ्रष्टाचार वाढत चालला आहे.

★ **चंगळवाद** :- आधुनिक काळात चंगळवाद प्रवृत्ती फोफावत चालली आहे. चंगळवाद म्हणजे सुखासीनतेची बेसुमार ओढ. म्हणजे जास्तीत जास्त सुखाचा मागे धावू लागला आहे. त्यामुळे सर्व प्रकारची सुखे देणा-या वस्तुंची हाव सर्वांच्या मनात निर्माण झाली आहे. विलासी वस्तूंना समाजात मानाचे स्थान मिळाले आहे. लोकांवर प्रचंड प्रभाव गाजवणा-या दूरदर्शन व चित्रपट या माध्यमांतुनही विलासी वृत्तीचे उदात्तीकरण केले जाते. या चंगळवादी प्रवृत्तीमुळेसुध्दा संपत्तीला अती महत्त्व प्राप्त झाले आहे. मग कोणत्याही मार्गाने जास्तीत जास्त संपत्ती मिळवणे, हे ध्येय उरते. यातूनही भ्रष्टाचाराला प्रसाराला वाव मिळत आहे.

★ **गुंतागुंताचे व वेगवान जीवन** :- आधुनिक जीवन खूप गुंतागुंतीचे व गतिमान झाले आहे. म्हणून प्रत्येकाला घाई असते. कोणीही थांबायला तयार नसतो.

सरकारी व महानगरपालिकेच्या कचेरीतील स्थिती नेमकी उलटी असते. तेथे सावकाश, अंत्यत धिम्या गतीने, लोकांचे किती नुकसान होते याची पर्वा न करता, बेफिकिरीने काम चालू असते. साहजिकच सरकारी कचे-यांत कामासाठी आलेले नागरिक हवालदिल होतात. आपली कामे त्वरेने व अचूक व्हावीत, यासाठी त्यांचे मन अधीर होते. नेमकी इथेच लाचलुचपतीला, भ्रष्टाचाराला सुरुवात होते. नोकरशाही या परिस्थितीत विनाविलंब गैरफायदा घेते.

★ **लोकसंख्या** :- भारताची प्रचंड लोकसंख्या हे अनेक समस्यांचे उगमस्थान आहे. लोकसंख्येंच्या जवळजवळ ४०% लोक दारिद्र्यरेषेखाली जगत आहेत त्यांना केवळ प्राथमिक गरजा भागवण्यासाठी पराकोटीचा जीवनसंघर्ष करावा लागतो. ही माणसे सहजगत्या भ्रष्टाचाराकडे वळतात.

### ★ भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रक्रिया ★

भ्रष्टाचार हा एक भयानक असा सामाजिक रोम आहे. भ्रष्टाचारामुळे देशाची अर्थव्यवस्था डबघाईला येते. देश प्रगती करु शकते. नागरिकांना योग्य सोयीसुविधा मिळू शकत नाहीत. उत्पादनवाढ व रोजगारनिमिर्ती यांना खीळ

बसते. बेकारी वाढते. समाज अशांत बनतो, शांतपणे व आनंदाने जगू शकत नाही. म्हणून कठारेपणे भ्रष्टाचार नष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**प्रत्येक नागरिकांची भूमिका** :- स्वतःला व स्वतःच्या कुटुंबीयांना जास्तीत जास्त सुखी ठेवण्याच्या कल्पनेमुळे व्यक्ती पैशाच्या मागे धावते. परंतु एखादया फसव्या क्षणी भ्रष्टाचाराला बळी पडते आणि भ्रष्टाचाराचा राजरोस मार्ग सुरु होतो.

भ्रष्टाचाराची ही विकृती घरातच अडवली गेली पाहिजे. प्रामाणिक मार्गाने आलेली संपत्ती घराला सुखसमृध्दी देते. पण वाममार्गांनी मिळविलेला संपत्ती घरात संकटे घेऊन येते. सुरुवातीच्या घरातल्या सगळ्यानीच वाममार्गाने आलेल्या पैशाला कडाडून केला पाहिजे. तसेच दुस-या माणसाचा भ्रष्आचार आपण पूर्णपणे थांबवू शकत नाही. हे खर, परंतु स्वतःच भ्रष्टाचार न करण्याचे व्रत घेता येते. त्यामुळे भ्रष्टाचाराची साखळी कुठेतरी ‘ खंडीत होऊ शकते. त्यासाठी प्राथमिक टप्पा असा की, स्वतःच्या कामात कार्यपध्दतीत कमालीची पारदर्शकता निर्माण करावी आणि स्वतःचे काम जास्तीत जास्त सचोटीने व जबाबदारीने पार पाडावे. ही भ्रष्टाचार निर्मूलनाची पहिली पायरी आहे.

समाजात भ्रष्टाचाराविरुध्द चीड निर्माण झाली पाहीजे. भ्रष्टाचार करणे अनैतिक मानले गेले पाहिजे. भ्रष्टाचार करणा-यांना समाजात मानमरातब मिळता कामा नये.

नागरिकांची भ्रष्टाचारांविरुध्द लढ्यात सक्रिय झाले पाहिजे. त्यासाठी वर्तमानपत्रे किंवा दूरदर्शन वाहिन्या यांचे सहाय्य घ्यावे.

विदयार्थ्यांना स्वतः करता येण्यासारख्या काही बाबी आहेत. घरात आई - वडील भ्रष्टाचारात गुंतले असतील, तर उघडपणे नाराजी व्यक्त करावी. भ्रष्ट पैशांतून आलेल्या सुखसोयींपासून दूर राहावे. आपल्या आईवडीलांचे झेपणार नाही. अशा खर्चाच्या गोष्टीसाठी आग्रह धरु नये.

१) भ्रष्टाचार निर्मूलनात न्यायालयाचे कार्य :- भ्रष्टाचार हा एक गंभीर गुन्हा आहे. भ्रष्टाचाराचे एकेका व्यक्तीवरच नव्हे, तर संपूर्ण समाजावर दूरगामी भीषण परिणाम होतात. म्हणून भ्रष्टाचाराला गुन्हे समजले जावे व भ्रष्टाचा-याला शिक्षा करता यावी म्हणून ‘ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९४७’ हा कायदा करण्यात आला. गरजेनुसार १९६४ मध्ये त्यात सुधारणा झाली. १९८८ मध्येही त्यात आणखी भर घालण्यात आली. यामुळे भ्रष्टाचाराच्या प्रकरणात आपण पोलिस ठाण्यात तक्रार करु शकतो. शासनाने भ्रष्टाचाराविरोधी कारवाई करण्यासाठी स्वतंत्र खातेच निर्माण केले आहे. पोलिस ठाण्यात तक्रार करू शकतो. शासनाने भ्रष्टाचाराविरोधी कारवाई करण्यासाठी स्वतंत्र खातेच निर्माण केले आहे. (**Anti Corruption Bureau** भ्रष्टाचार प्रतिबंधक खाते)

    तेथेही आपण तक्रार करु शकतो. त्या खात्यातील पोलिस सापळा रचून लाच घेणा-याला अटक करतात. पूर्वी नगरसेवक, आमदार, खासदार यांचा समावेश असलेले ‘ लोकसेवक विधेयक’ आणले. आता यांच्यापैकी कोणीही भ्रष्टाचार करीत असेल, तर लोक पोलिसांकडे तक्रार करु शकतात.

१) ग्राहक चळवळ :- भ्रष्टाचाराविरुध्द एक दमदार व मोठे पाऊल म्हणजे ‘ग्राहक चळवळ’ होय. ग्राहक चळवळीचे कार्य दुहेरी आहे. भ्रष्टाचार करण्या-याविरुध्द लढाई करणे आणि ग्राहकांना जागृत करणे, ग्राहकांना भ्रष्टाचाराविरोधी लढाईचे प्रशिक्षण देणे, ग्राहकांना संघटित करणे या दोन पातळ्यांवर ग्राहक चळवळीचे कार्य चालते. एकटादुकटा ग्राहक आपल्यावरील अन्यायविरुध्द समर्थपणे लढू शकत नाही. म्हणून संघटितपणे लढा देण्याकरिता ‘ग्राहक चळवळ’ निर्माण करण्यात आली आहे.

    केंद्र शासनाने ‘ ग्राहक संरक्षण कायदा १९७६’ कार्यान्वित केला आहे. त्याची काही ठळक वैशिट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

    ★ उत्पादक ग्राहकांना नाडतात, फसवतात. हाही भ्रष्टाचारच आहे. आपल्या फसवणुकीविरुध्द ग्राहक प्रत्यक्ष तक्रार करु शकतो. जिल्हा ग्राहक मंच त्यावर थेट कारवाई करु शकतो.

★ सरकारी मालकीच्या सार्वजनिक उद्योगांविरुध्द तक्रार करता येते. रेल्वे, दूरसंचार, बँका, विमा कंपन्या, वीजमंडळ वगैरे अनेक आस्थापनांविरुध्द स्वतः ग्राहक किंवा ग्राहकांच्या वतीने ग्राहक संघटना तक्रार करु शकतात. आतापर्यंत शेकडो ग्राहकांना त्यांच्यावरील अन्यायाविरुध्द दिलासादायक निर्णय मिळाले आहेत.

★ ग्राहक संरक्षण कायदयामुळे विविध पातळ्यांवरील गैरव्यवहाराला बराच अटकाव झाला आहे.

★ ग्राहकाने तक्रार नोंदवण्याची पध्दत अंत्यत साधी, सोपी आहे. कोणत्याही भाषेत तक्रार करता येते. आपल्या कार्यक्षेत्रातील तक्रार असल्यास ग्राहक मंच ती तक्रार स्वीकारतो. नंतर मंच तक्रारीची प्रत संबंधित प्रतिवाद्याला पाठवतो. प्रतिवादयाने एका महिन्यात उत्तर देणे अपेक्षित असते. ग्राहक मंच त्यानंतर निवाडा करतो.

## ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत यंत्रणा

१) जिल्हामंच :- प्रत्येक जिल्ह्यासाठी असतो. जिल्हा न्यायाधीश हा जिल्हामंचाचा प्रमुख असतो.

२) राज्य आयोग :- ५ लाख रुपये ते २० लाख रुपयांपर्यतच्या तक्रारी राज्य आयोगाकडे येतात. उच्च न्यायालयात कार्यरत असलेले न्यायाधीश राज्य आयोगाचे प्रमुख असतात. शिवाय अन्य दोन प्रमुख असतात. त्यापैकी एक सदस्य महिला असणे आवश्यक असते.

३) राष्ट्रीय आयोग :- सर्वोच्च न्यायालयात कार्यरत असलेले न्यायाधीश या आयोगाचे प्रमुख असतात. आणखी अन्य चार सदस्य असतात. त्यापैकी एक सदस्य महिला असणे आवश्यक आहे.

४) न्यायाधिकरण :- न्यायालयात अनेक प्रकारचे असंख्य खटले दाखल होत असल्याने निकालास विलंब होतो. यातुन मार्ग काढण्यासाठी विविध न्यायधिकरणांची स्थापना करण्यात आली आहे. न्यायाधिकरणाचे अध्यक्ष म्हणून उच्च न्यायालयातील न्यायमूर्तीची नेमणूक होत. काही तक्रारी विशिष्ट स्वरुपाच्या असतात. उदाः कामगार – मालक तंटे. अशा विशिष्ट क्षेत्रातील तक्रारीची सोडवणूक करण्यासाठी क्षेत्रनिहाय न्यायधिकरण स्थापन करण्यात आले आहे. आपल्या राज्यात खालील न्यायधिकरणे स्थापन करण्यात आलेली आहेत.

१) मोटार अपघातासाठी – प्रत्येक जिल्ह्यात

२) सरकारी कामकाजासाठी – प्रत्येक जिल्ह्यात

३) कामगारविषयक – विभागणीय

४) शेतसारा – आयकराविषयक – विभागणीय

५) शिक्षक – प्राध्यापक यांच्या संबंधात – दोन विदयापिठांना मिळून एक.

६) रेल्वे व प्रशासकीय कामकाजासाठी – फक्त मुंबई.

न्यायदानातील विलंब टाळण्यासाठी व न्यायदानाचे विक्रेंदीकरण व्हावे म्हणून मुख्यतः न्यायधिराणे स्थापण्यात आलेली आहे.

Anti Corruption Intelligence Committee

भारतीय भ्रष्टाचार निवारण संस्था

# "भ्रष्टाचार मुक्त भारत"

" ज्ञापन "

(मेमोरेन्डम ऑफ असोसिएशन)

संस्थेचे ध्येय आणि उद्देश :-

१) समाजाचा पिडीत लोकांचे निवारण करण्यासाठी प्रयत्न करणे.

२) समाजाचे हितासाठी सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम नियोजित करणे.

३) सर्वप्रांतीय लोकांना सामाजिक हितासाठी कार्य करणे.

४) शैक्षणिक आणि अन्य सामाजिक कार्य करणे.

५) समाजात न्याय शैक्षणिक आणि इतर भ्रष्टारांची माहिती संबंधित विभागात देणे.

६) शैक्षणिक संस्था व इतर संस्थेमध्ये व्याप्त भ्रष्टाचाराची आणि बेकायदेशीर कामाची माहिती संबंधी विभागात जाऊन निवारण करणे.

७) सांस्कृतिक कार्य व गरीब लोकांची मदत करण्याचा प्रयत्न व त्यांची समस्यानुसार मदत करणेबाबत.

हिंन्दी :-

१) समाज में पिडीत लोगों के समस्योंओ का निराकरण करना!

२) समाजहित के लिए सामाजिक, सांस्कृतिक, कार्यक्रम का नियोजन करना!

३) सर्वप्रातींय लोंगों के हित के लिए कार्य करना !

४) शैक्षणिक अन्य सामाजिक कार्य करना!

५) समाज में न्याय शैक्षणिक व इतर भ्रष्टाचार की जानकारी संबंधित विभाग को देना !

६) शैक्षणिक संस्था व इतर संस्थे में व्याप्त भ्रष्टाचार की और बेकायदे से होनेवाली कामों की जानकारी संबंधित विभाग मे जाकर निवारण करना !

७) सांस्कृतिक कार्य व गरीब लोंगो की मदद करने का प्रयत्न समस्यानुसार मदत करना !

1) Acts & objects of the institution

1) To concentrate and try to solve various problem of aggrieved persons of the society.

2) To arrange different social and culture activities for the benefit and welfare of the general public living in the society.

3) Take various workshop and to arrange different programmers for the wellbeing and welfare of the general public living in the society.

4) To focus and conduct various educational, social and other activities for educational and social propose, beneficial of the society.

5) To help and assist to the aggrieved person, seeking person legal assistance and guidance.

6) To provide legal help and assistance to needy and aggrieved persons.

7) Try to refute any illegal and corrupt practices / services facing to aggrieved persons. And to conduct the various social and culture programmers for the awareness of the 4 constitutional rights and duties of the citizens.